नि. फौ. खटला क्र. <u>२८/२०२१</u>
सरकार विरूद्ध ओमप्रकाश
**निशाणी १४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : अजय लक्ष्मण पारवे,
वय : ३० वर्षे,
धंदा : चिकन विक्रेता,
राहणार : नाईकवाडी पुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. २३/११/२०२० रोजी पोलीसांनी मला बोलवले नव्हते. माझेसमक्ष पंचनाम्याची कारवाई झाली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर अनु क्र. १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २३/११/२०२० रोजी भाजी बाजार, अकोट या ठिकाणी पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी साक्षीदार म्हणुन बोलवले होते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदर बाजारात माझे चिकन विक्रीचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी माझे

समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व मला वाचुन दाखवला व त्यावर मी त्याठिकाणी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरून एक मोबाईल चोरीला गेल्याचे मला समजले होते.

३. मी नववा वर्ग शिकलो आहे परंतु मला लिहिता—वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुठलाही दस्त समजुन घेतल्याशिवाय त्यावर मी सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपींतर्फे ॲडव्होकेट श्री. एम. एन. वर्मा यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०९.०२.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.